**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४**

---

*निकाल प्राधान्य/तातडीचे*

क्र.कोविमं/उच्च माध्य.गोप./629
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- २३/०७/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) साठी मूल्यमापन कार्यपद्धतीने निकाल समितीने प्रमाणित केलेले विद्यार्थ्यांचे निकाल व अनुषंगिक प्रपत्रे सिलबंद पाकिटे संकलन केंद्रावर जमा करण्याबाबत...

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/उच्च माध्य.गोप./६११, दि. २०/०७/२०२१

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी निकाल समितीने प्रमाणित केलेल्या निकालाची सिलबंद पाकिटे संकलन केंद्रावर जमा करण्यासाठी **शुक्रवार दिनांक :- २३/०७/२०२१ व शनिवार दिनांक:- २४/०७/२०२१ या कालावधीत आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधीत वितरण केंद्रावर जमा करण्याबाबत** कळविण्यात आले होते. तथापि सतत पडणा-या मुसळधार पावसामुळे वाहतुक व्यवस्था विस्कळीत झाली असून वितरण केंद्रापर्यंत कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना प्रवास करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे **शनिवार दिनांक २४/०७/२०२१ ऐवजी सोमवार दिनांक २६/०७/२०२१ व मंगळवार दिनांक २७/०७/२०२१ या कालावधीत आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधीत वितरण केंद्रावर जमा करण्याची दक्षता घेण्यात यावी.**

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर